गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक ११९ वा | शनिवार १६ सप्टेंबर २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 119 | Date : 16/09/2023 | blow : Saturday | Page 4 | Price 4

## मराठवाड्यातील मंत्रिमंडळ बैठकीत घोषणांचा वर्षाव होणार

मुंबई : राज्य मंत्रिमंडळाची या आठवड्यातील बैठक आज (१६ सप्टेंबर) मराठवाड्यात होणार आहे. बैठकीसाठी जोरदार तयारी करण्यात आली आहे. या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घोषणांचा वर्षाव होणार आहे. मंत्रिमंडळ बैठकीत ४० हजार कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सर्व विभागाने वेगवेगळे प्रस्ताव पाठवले असून आज रात्रीपर्यंत यावर निर्णय होणार आहे. यामध्ये सर्वाधिक सिंचन प्रकल्पांच्या संदर्भात १३ ते १४ हजार कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणा होणार आहे. मराठवाड्यात सात वर्षांनंतर मंत्रिमंडळ बैठक होत आहे. त्यामुळे आगामी निवडणुका समोर ठेवून योजनांचा वर्षाव होणार आहे.



**मंत्रिमंडळ बैठकीत काय निर्णय होण्याची शक्यता?**

✲ मराठवाड्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी नदीजोड प्रकल्प फोकस केला जाणार ✲ काही बंद पडलेले सिंचन प्रकल्प आहेत त्यांना भरघोस निधी दिला जाणार ✲ मराठवाड्यात सोयाबीन पीक मोठ्या प्रमाणात असल्याने सोयाबीन रिसर्च सेंटरची घोषणा होणार ✲ मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी मेडिकल आणि कृषी कॉलेजची घोषणा होणार ✲ मराठवाड्यात अनेक निजामकालीन शाळा आणि कार्यालय आहे त्यांच्या पुर्नविकासाठी निधीची तरतूद केली जाणार । पान २ वर

## अंतिम मतदार यादी ५ जानेवारी रोजी प्रसिद्ध होणार

नगर: आगामी निवडणुकीसाठीची अंतिम मतदारयादी ५ जानेवारी २०२४ रोजी प्रसिद्ध होणार असल्याचे सांगत राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी अप्रत्यक्षपणे त्यानंतरच लोकसभा निवडणुका होतील, असे सूचित केले. दरम्यान, आज, शुक्रवारी निवडणूक यंत्रणेचा आढावा घेण्यासाठी नगरमध्ये होते. त्यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील ३८ महाविद्यालयांचे नोडल अधिकारी व विद्यार्थ्यांसाठी 'मतदार साक्षरता मंडळा'च्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्ताने देशपांडे पत्रकारांशी बोलत होते.



या वेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ व निवडणूक शाखेचे उपजिल्हाधिकारी राहुल पाटील उपस्थित होते.यापूर्वीची लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका एकत्रित घेण्याचा निर्णय झाला, तरी त्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सक्षम असल्याचे, तसेच लोकसभा निवडणूक एप्रिल २०२४ पूर्वी घेण्याचे ठरले तरीही यंत्रणा तयार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे लोकसभा निवडणूक एप्रिलमध्ये झाली होती. आता त्या एप्रिलपूर्वी जरी घ्यायच्या असतील तरीही त्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले. विधानसभा व लोकसभा निवडणुका यापूर्वीही एकत्र झाल्या आहेत. दोन्ही निवडणुका एकत्र घेण्यासाठी प्रशासकीय । पान २ वर


## बांगलादेशचा भारतावर ६ धावांनी विजय



कोलंबो : आशिया चषकातील सुपर ४ फेरीतील अखेरच्या सामन्यात भारतीय संघाला सहा धावांनी पराभवाचा सामना करावा लागला. अखेरच्या षटकापर्यंत रंगलेल्या सामन्यात बांगलादेश संघाने भारताचा सहा धावांनी पराभव केला. बांगलादेशने दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघ २५९ धावांत संपुष्टात आला. बांगलादेशने भारतासमोर २६६ धावांचे आव्हान ठेवले होते. प्रत्युत्तरदाखल भारतीय संघाने २५९ धावांपर्यंत मजल मारली. शुभमन गिल याची शतकी खेळी व्यर्थ गेली. शुभमन गिल याचे शतक आणि अक्षर पटेल याची जिगराज ४२ धावांची खेळी वगळता इतर फलंदाजांना मोठी खेळी करता आली नाही. गिल-अक्षरचा अपवाद वगळता भारताच्या इतर एकाही फलंदाजाला ३० धावसंख्या पार करता आली नाही. रोहित शर्मा, केएल राहुल, सुर्यकुमार, इशान किशन आणि रविंद्र जाडेजा हे फलंदाज अपयशी ठरली.

## जेलमध्ये गेल्यामुळे संजय राऊत यांच्या डोक्यावर परिणाम झालाय : चित्रा वाघ

गोंदिया : 'शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी सरकारचा अंत्यविधी आम्ही थाटात करु,' असे वक्तव्य केल्यानंतर भाजपच्या महिला प्रदेशाध्यक्ष नेत्या चित्रा वाघ यांनी त्यांच्यावर जोरदार टीका केली आहे. संजय राऊत हे १०३ दिवस जेलमध्ये राहून आलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या डोक्यावर परिणाम झालेला आहे आणि त्या मानसिकतेतून ते बोलत असतात, असं चित्रा वाघ म्हणाल्या. 'मेरी माटी मेरा देश' या अभियानासाठी गोंदिया जिल्ह्यात आल्या असताना त्यांनी ही प्रतिक्रिया दिली.



आमचे सरकार हे फेसबुक लाईव्हचे सरकार नसून लोकांचे चेहऱ्यावर स्माईल आणणारं सरकार आहे, असं म्हणत त्यांनी उद्धव ठाकरे यांनाही टोला लगावला आहे.

स्वातंत्र्याची ७५ वर्षे भारतीय संस्कृतीचा आणि कर्तृत्वाचा गौरवशाली इतिहास साजरा करण्यासाठी आणि त्याचे स्मरण करण्यासाठी 'मेरी माटी मेरा देश' हा उपक्रम भारत सरकार राबवत आहे. चित्रा वाघ यांनी देखील आज गोंदियात जाऊन भरपावसात 'मेरी माती मेरा देश' या उपक्रमासाठी माती संकलित केली. गोंदिया विधानसभा क्षेत्राचे अपक्ष आमदार विनोद अग्रवाल यांनी सपत्नीक तर भाजपचे माजी आमदार गोपाल अग्रवाल यांच्या पत्नीने देखील या माती कलशात माती टाकून देशाप्रति आपली भावना व्यक्त करत । पान २ वर

## नव्या संसद भवनातील दालनांचं वाटप, नितीन गडकरींना जी-३१ दालन

नवी दिल्ली : नव्या संसद भवनात १८ सप्टेंबरपासून विशेष अधिवेशन पार पडणार आहे. त्यासाठी मंत्र्यांना दालनाचे वाटप करण्यात आले आहे. यासंबंधीची यादी देखील जारी करण्यात आली आहे. नव्या संसद भवनात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे दालन हे तळमजल्यावर असणार आहे. तळमजल्यावरील दालन क्रमांक जी ३३ हे अमित शाह यांना देण्यात आले आहे. तर केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचे देखील दालन तळमजल्यावरच असणार आहे. तळमजल्यावरील जी - ३४ हे दालन त्यांना देण्यात येणार आहे. केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांना दालन क्रमांक जी-८ देण्यात आले असून पीयूष गोयल यांना जी-३० हे दालन देण्यात आलं आहे.

रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना अपर ग्राऊंड फ्लोअरवरील दालन क्रमांक जी - ३१ देण्यात आलं आहे, तर अर्थमंत्री निर्मला



सीतारामन यांना दालन क्रमांक जी-१२, केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री नरेंद्र सिंह तोमर यांना दालन क्रमांक जी - ११ देण्यात आलं आहे. परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांना दालन क्रमांक जी -१० देण्यात आलं आहे. आदिवासी कार्य मंत्री अर्जुन मुंडा यांना दालन क्रमांक जी- ०९, शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना जी - ४१ आणि रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना त्याच मजल्यावरील दालन क्रमांक जी- १७ देण्यात आलं आहे.

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे यांना पहिल्या मजल्यावरी एफ- ३९, आयुषमंत्री सर्बानंद सोनोवाल यांना एफ - ३८, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री वीरेंद्र कुमार यांना एफ - ३७, ग्रामीण विकास आणि पंचायती राजमंत्री गिरिराज सिंह यांना एफ - ३६ हे दालन देण्यात येणार आहे. नागरी उड्डाण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांना एफ-२०, मंत्री पशुपती कुमार पारस यांना एफ-१९, जलशक्ती मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांना एफ-१८, विज्ञान मंत्री किरेन रिजिजू यांना एफ- १ आणि । पान २ वर

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर नसते तर मी संसदेपर्यंत पोहोचू शकलो नसतो : ना.आठवले

मुंबई : भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व जाती धर्मियांच्या उद्धारासाठी; भारत देशाला घडविण्यासाठी भरीव योगदान दिले आहे.



त्यांनी समतेचा आणि विश्वबंधुत्वाचा सांगितलेला विचार जगाने स्वीकारला आहे.डॉ बाबासाहेब आंबेडकरांची विद्वात्ता आणि विचार जगाला मार्गदर्शक ठरली आहे.डॉ बाबासाहेब आंबेडकर नसते तर मी संसदे पर्यंत पोहोचलो नसतो ;लंडन मध्ये ही पोहोचलो नसतो. डॉ बाबासाहेब आंबेडकर नसते तर आम्ही कुठेच नसतो. त्यांच्या नावाने लंडन च्या पार्लमेंट मध्ये मला पुरस्कार मिळत असल्याचा मला अभिमान आहे असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले. लंडनच्या पार्लमेंटमध्ये वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड तर्फे आज ना.रामदास आठवले यांचा डॉ.भीमराव आंबेडकर अवॉर्ड २०२३ या आंतरराष्ट्रीय पुरस्काराने गौरव करण्यात आला त्यावेळी ना.रामदास आठवले बोलत होते. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा धागा पकडून मी देशभर काम करीत आहे.त्यामुळे हा । पान २ वर

## विवेकानंद प्रतिष्ठान वतीने रद्दीतून शिक्षण अंतर्गत शिष्यवृत्ती वितरण सोहळा

अक्कलकोट/प्रतिनिधीः अभियंता दिनाचे औचित्य साधून विवेकानंद प्रतिष्ठान अक्कलकोट च्या वतीने श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संचलित कै. कल्याणराव इंगळे पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना रद्दीतून शिक्षण या उपक्रमांतर्गत शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मनीषा आव्हाळे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा आ.सचिन कल्याणशेट्टी, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सचिन खुडे , भाजपा तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड व प्राचार्य नागनाथ जेऊरे यांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन संपूर्ण करण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य




जेऊरे सर यांनी केले. या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे धनादेश वितरित करण्यात आले. त्यावेळी प्रत्येकी दहा हजार असे एकूण ११ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आले. अशोक येणगुरे यांनी विवेकानंद प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध समाजोपयोगी उपक्रमांची माहिती दिली. यावेळी सोलापूर जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी रद्दीतून शिक्षण ही अत्यंत कल्पक योजना असून त्याची उत्तम अंमलबजावणी यावर समाधान व्यक्त केले. यावेळी अभियंता दिनाच्या शुभेच्छा देताना मनीषा आव्हाळे यांनी हिरोजी इंदुलकर यांचा प्रकर्षाने उल्लेख केला. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, जिद्द, चिकाटी व सातत्यपूर्ण प्रामाणिक प्रयत्न केल्यास नक्कीच यश संपादन करता येते असे प्रतिपादन केले. यावेळी त्यांनी आ.सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या कार्यावर सुद्धा अतिशय समाधान व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी उपस्थितांना अभियंता दिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि सर्व विद्यार्थ्यांनी उत्तम प्रकारे शिक्षण घेऊन राष्ट्रबांधणीच्या कार्याला हातभार लावावा व पंतप्रधान मोदी यांच्या भारताच्या आर्थिक महासत्ता बनवण्याच्या प्रयत्नांना बळ द्यावे असे आवाहन केले. । पान २ वर

## गणेशोत्सव सामाजिक उपक्रम राबवून पर्यावरणपूरक पध्दतीने साजरा करा : जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर शहर व तालुक्यात सर्वच समाजाचे सण, उत्सव एकत्र येऊन आनंदाने साजरे करतात व जातीय सलोखा अबाधित ठेवतात. हीच परंपरा कायम ठेवून, गणेशोत्सव तसेच अन्य आगामी सण उत्सव साजरे करावेत.आगामी गणेशोत्सव करताना गणेशोत्सव मंडळांनी सामाजिक उपक्रम राबवून पर्यावरणपूरक पध्दतीने साजरा करावा असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी केले आहे.




श्री गणेशोत्सव व ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर रखुमाई सभागृह, पोलीस संकुल पंढरपूर येथे शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अपर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, प्रांताधिकारी गजानन गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसिलदार सुशिल बेल्हेकर, मुख्याधिकारी अरविंद माळी, वीज वितरणरचे उप कार्यकारी अभियंता श्री.भोळे, उप विभागीय अभियंता भीमाशंकर मेटकरी, पोलीस निरिक्षक अरुण फुगे, मिलींद पाटील , गणेशत्सोव मंडळाचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पोलीस पाटील यांच्या सह पदाधिकारी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पोलीस अधीक्षक सरदेशपांडे म्हणाले, गणेशोत्सवात पारंपरिक वाद्यांचा वापर करावा ध्वनिक्षेपकाच्या आवाजाची मर्यादा पाळावी. पोलीस प्रशासन सर्वांसाठी सज्ज आहे. लागणारी आवश्यक ती मदत पोलीस प्रशासनाकडून करण्यात येईल. पंढरपूर शहरातील नगरपालिका, महावितरण पोलीस प्रशासन यांनी शहरातील संयुक्त पाहणी करून आवश्यक ठिकाणी तात्काळ सुविधा उपलब्ध कराव्यात. नागरिकांनी समाज माध्यमातून जातीय तेढ निर्माण होईल असे संदेश प्रसारित होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. शहरातील व ग्रामीण भागातील गणेशत्सोव मंडळांनी पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करतील तसेच कायदा व सुव्यवस्थेचे पालन करतील अशा रचनात्मक काम करणाऱ्या मंडळांसाठी पोलीस प्रशासनाकडून बक्षीस योजना जाहिर केली आहे. तसेच या कालावधीत सामाजिक, जातीय सलोखा राखण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या नागरिकांचाही सन्मान करण्यात येणार येणार आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने जिल्ह्यात सामाजिक आणि धार्मिक शांतता बिघडवणाऱ्या लोकांवर तसेच इतर गुन्हे करणाऱ्या लोकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

अपर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव म्हणाले, गणेशोत्सव मंडळानी कागदपत्रांची पूर्तता करून आवश्यक ती परवानगी घ्यावी.गणेशोत्सवासाठी उभारण्यात येणारा मंडप सार्वजनिक जागेत असेल तर त्या संबंधित । पान २ वर

# पो.पाटील संघटनेच्या वतीने भाग्यश्री पाटोळे या नवदुर्गा पुरस्काराने सन्मानित

## जिल्ह्यातील नऊ महिला पोलीस पाटील नवदुर्गा पुरस्काराने सन्मानित

निफाड/प्रतिनिधीः सिन्नर तालुक्यातील आशापुर येथील महिला पोलीस पाटील सौ भाग्यश्री पाटोळे यांना महाराष्ट्र राज्य पो.पाटील संघ नाशिक जिल्ह्याच्या वतीने प्रशासनातील



नवदुर्गा पुरस्कार देऊन नुकतेच गावरान व्हिलेज हॉटेल नाशिक येथे सन्मानित करण्यात आले. नाशिक जिल्हा पोलीस पाटील संघाचा पुरस्कार वितरण सोहळा राज्य उपाध्यक्ष संपत जाधव यांचे अध्यक्षतेखाली नुकताच पार पडला याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अप्पर पोलीस अधीक्षक माधुरी कांगणे, जिल्हाध्यक्ष अरुण बोडके. जिल्हा सचिव रवी जाधव हे होते. पोलीस पाटील संघाचे वतीने प्रशासनातील नवदुर्गा पुरस्काराचे हे प्रथम वर्ष असून जिल्ह्यातील नऊ महिला पोलीस पाटील यांची निवड केली जाणार आहे. ज्या महिला पोलीस पाटील आपल्या कुटुंबाची जबाबदारी सांभाळून सामाजिक बांधिलकी जपत उत्तम कार्य करीत आहेत.त्यांना हा मानाचा पुरस्कार देण्यात येणार आहे.यामध्ये सौ भाग्यश्री पाटोळे यांच्या कार्याची दखल घेऊन निवड करण्यात आली असून अप्पर पोलीस अधीक्षक माधुरी कांगणे यांचे हस्ते त्यांना. सन्मानचिन्ह शाल . देऊन नवदुर्गा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

याप्रसंगी संघ राज्य पदाधिकारी चिंतामण मोरे, अशोक सांगळे, सोमनाथ मुलाने ,कार्यकारी अध्यक्ष मुकेश कापडी, कार्याध्यक्ष किरण पाटील, अध्यक्ष बबन बेंडकुळे, सर्व जिल्हा पदाधिकारी तालुका पदाधिकारी तसेच राजकीय सामाजिक शैक्षणिक धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते उपस्थितांचे वतीने व परिसरातील नागरिकांच्या वतीने त्यांचे अभिनंदन केले जात आहे

# नागरिकांनी जातीय सलोखा ठेवून गणेशोत्सव साजरा करावा : उपमुख्यमंत्री अजित पवार



पुणे : राज्यात काही दिवसातच गणरायाचे आगमन होणार असून नागरिकांनी जातीय सलोखा ठेवून गणेशोत्सव साजरा करावा, तसेच जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड गणेशोत्सव मंडळाच्यावतीने तयार करण्यात आलेल्या शेतकऱ्यांसाठी मोफत अन्नदान कक्षाचे उद्घाटन, शारदा गजानन पुरस्कार व जिल्हा स्तरीय महिला व पुरुष कबड्डी स्पर्धा बक्षिस वितरण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर, संचालक गणेश घुले, कार्याध्यक्ष प्रसाद गव्हाणे, गणेश मंडळाचे अध्यक्ष सागर भोसले आदी उपस्थित होते.

श्री. पवार म्हणाले, श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड गणेशोत्सव मंडळातर्फे देण्यात येणारे विविध पुरस्कार आणि शेतकरी बांधवांसाठी मोफत भोजनाचा उपक्रम चांगला आहे. शेतकरी कष्टकरी आहे, लाखाचा पोशिंदा आहे. शेतमालातील चढउतार लक्षात घेऊन बाजारभाव शेतकऱ्यांना आणि ग्राहकांना परवडण्याच्यादृष्टीने शासनाकडून समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जातो. राज्यातील काही भागात सध्या अवर्षणाची परिस्थिती आहे. गेल्या चार-पाच दिवसात काही ठिकाणी पाऊस झाला असला तरी तो पुरेसा नाही. शेतकऱ्यांसमोर बिकट संकट उभे राहिले असून पिकांचे नुकसान होत आहे. पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी, शेतकऱ्यांपुढील संकटावर मात करण्यासाठी शासन निधीची कमतरता पडू देणार नाही, असेही ते म्हणाले. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अडीअडचणी, शेतकऱ्यांच्या काही सूचना असतील तर त्या सोडविण्यासाठीचा प्रस्ताव सादर करावा. पणन मंत्री, संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावले जातील. स्वच्छतेबाबत मार्केट यार्ड आणि पुणे महानगरपालिकेने समन्वय ठेवावा. पुणे येथील कृषी उत्पन्न बाजार समिती सर्वच बाबतीत पुढे राहील, तिचा नावलौकीक वाढेल यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

बालेवाडी येथे ऑलिंपिक भवनाच्या उभारण्यासाठी ७५ कोटीचा आराखडा तयार करण्यात आला आहे. त्याला मूर्तस्वरूप देण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. विभागीय, जिल्हा आणि तालुका क्रिडा संकुलासाठी निधी देण्यात येत आहे. देशाला पहिले ऑलिम्पिक पदक मिळवूण देणाऱ्या स्व. खशाबा जाधव यांचा जन्म दिन आपण राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे म्हणून बक्षिसांच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यातून आता पुणे शहर, पिंपरी-चिंचवड शहर आणि पुणे ग्रामीण असे ३ संघ क्रीडा स्पर्धेत सहभागी होतात. यापूर्वी पुणे जिल्ह्यातून एकच संघ भाग घेत असे. एकंदरीतच राज्यात तरुण तरुणींमध्ये क्रीडा संस्कृती रुजविण्याचे कार्य सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

# युवक काँग्रेस वतीने अक्कलकोट शहरातील खड्ड्यांचे दुरूस्तीसाठी मुख्याधिकारी यांना निवेदन




अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट संपुर्ण शहरभरात व मुख्य रस्त्यावरती पूर्णतः खड्डेच खड्डे पडलेले आहेत.

तरी येणारा गणेशोत्सव,गौरी,इद ए मिलाद, या सणांमध्ये शहरात नागरिकांच गर्दी-वर्दळ मोठ्या प्रमाणात होणार आहे.त्यासाठी तत्काळ खड्डे बुजवून घेण्याचा विनंती युवक काँग्रेस वतिने नगरपरिषद प्रशासनकडे करण्यात आली.सदरील निवेदन अक्कलकोट नगरपरिषद मुख्याधिकारी श्री सचिन पाटील यांना देण्यात आले. यावेळी अक्कलकोट शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष मुबारक कोरबु, अक्कलकोट युवक ता अध्यक्ष बाबासाहेब पाटील,अतिक बागवान, राहुल मोरे,जब्बार बागवान, विलास राठोड,बसवराज अल्लोळी, शिवशरण इचगे,आकिब शेरीकर, इंद्रजीत गद्दी, गुरू म्हेत्रे,बालाजी शापवाले,राहुल भकरे, असिफ जमादार,अझहर जंगी,रियाज विजापुरे, तन्वीर सुतार,अतिक अन्सारी,विकी कोरे,सतिश चिंचोळी आदिसह युवक काँग्रेस कार्यकर्ते बहुसंख्येत उपस्थित होते

# अनिसचा उपक्रम:अमावास्येच्या रात्री स्मशान सहल

सोलापूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सोलापूर शहर शाखा आयोजित स्मशान सहल १४ सप्टेंबर गुरुवार रोजी काढण्यात आली होती. खास अमावस्येच्या रात्री दहा ते एक वाजेपर्यंत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते आणि नागरीक हे सार्वजनिक स्मशानभूमी रविवार पेठ अक्कलकोट रोड, पाण्याच्या टाकीजवळ सोलापूर येथे या विशेष सहलीसाठी उपस्थित होते. या सहलीमध्ये स्मशान भूते व त्या संबंधित असणाऱ्या अंधश्रद्धा या विषयावरती अनिस सोलापूर शहर शाखा कार्याध्यक्ष डॉ अस्मिता बालगावकर यांनी मार्गदर्शन केले.

भुते स्मशानात राहतात , अमावस्येच्या रात्री भुते दिसतात, स्मशानात नकारात्मक ऊर्जा असते, भुताचे पाय उलटे असतात ,आत्मा भूत पिषाच, संमंध हडळ चेटकिन डाकीन इत्यादी अस्तित्वात असतात, भुताचा माणसाच्या शरीरात संचार होऊ शकतो, मंत्रतंत्र शक्तीने ते पळून जातात, प्लानचेटने आपण आत्म्याला बोलावून त्यांच्याशी संवाद साधू शकतो इत्यादी अनेक प्रकारच्या अंधश्रद्धांवर सखोल चर्चा आणि मार्गदर्शन करण्यात आले. यानंतर प्रधान सचिव श्री ब्रह्मानंद धडके यांनी करणी करणे, भूत उतरवणे भूत गाढणे इत्यादी वैज्ञानिक प्रयोगाद्वारे कसे खोटे असते हे सिद्ध करून दाखवले.

कार्यक्रमाची सुरुवात अध्यक्ष प्रा शंकर खलसोडे यांनी समाज प्रबोधन पर गीताने केली. अंधश्रद्धा निर्मूलन समितीची गीते सुद्धा यावेळी सर्वांनी मिळून गायली. शेवटी उपस्थितांना या विषया संदर्भात असणारे प्रश्न , शंका यांचे निरसन सुद्धा करण्यात आले.



कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी वैज्ञानिक प्रतिज्ञा घेतली. या स्मशान सहलीत काही कार्यकर्त्यांचे वाढदिवस सुद्धा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आले. ३ वर्षाच्या बालकापासून ७० वर्षांच्या जेष्ठ मंडळी पर्यंत सर्वांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

या स्मशान सहलीत अध्यक्ष प्रा शंकर खलसोडे, कार्याध्यक्ष डॉ अस्मिता बालगावकर, सचिव ब्रह्मानंद धडके, विजय जाधव, डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, यशवंत फडतरे, ऍड सरिता मोकाशी, निशा भोसले, लता ढेरे, शकुंतला सुर्यवंशी, डॉ निलेश गुरव, धनाजी राऊत, सनी दोशी, श्री कनकी इ कार्यकर्ते उपस्थित होते. इतर नागरिक, विदयार्थी, पोलिस, पत्रकार यांनीही सदर कार्यक्रमात सक्रीय सहभाग घेतला.

# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात अभियंता दिनी अभियंत्यांचा सत्कार

अक्कलकोट/प्रतिनिधी : महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या सौ. सुरेखा कल्याणशेट्टी माध्य. व उच्च माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गिरीजामाता मराठी व सेमी इंग्रजी प्राथमिक विद्यालय, यांच्या वतीने कै पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात थोर अभियंता मोक्षगुंडम सर विश्वेश्वरय्या यांचा जन्मदिवसअभियंता दिन म्हणून मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, अक्कलकोट जलसंधारण उपविभागीय अधिकारी अभियंता आर. डी. क्षीरसागर, सार्वजनिक बांधकाम उपविभागीय अभियंता ए. आर. खमीतकर, अक्कलकोट विद्युत उपविभागीय अभियंता श्री संजीवकुमार म्हेत्रे, नावलौकिक व जेष्ठ अभियंते अशोक येणेगुरे, अभियंता सलोनी शहा, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी हे उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते मोक्षगुंडम सर विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच अभियंता दिनाचे औचित्य साधून उपस्थित अभियंत्यांचा सत्कार जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी सौ निशिगंधा कोळी यांनी सर विश्वेश्वरय्या यांच्या जीवनकार्याची माहिती दिली. तसेच अभियंता अशोक येणेगुरे, ए आर खमीतकर, संजीवकुमार म्हेत्रे यांची मार्गदर्शनपर भाषणे झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्तविक खंडेराव घाटगे यांनी केले तर आभार कल्पना स्वामी यांनी मानले या कार्यक्रमास संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी,सीईओ सौ रुपाली शहा, ज्युनियर विभाग प्रमुख सौ पूनम कोकळगी, संचालक मल्लिनाथ मसुती, प्राथमिक मुख्याध्यापक सुरेश आवटे, निखिल भालेराव, प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारीवर्ग उपस्थित होते.




# अभियंत्याला कोणत्याही क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देता आले पाहिजे : जेष्ठ शिक्षणतज्ञ प्रा.नारायण दिवेकर





पंढरपूर/प्रतिनिधीः 'इंजिनिअर्स हे लढाऊ योद्धे असतात. ते समाजातील समस्या आपल्या बौद्धिक क्षमतेने सोडवत असतात. त्यासाठी त्यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण पुस्तकी ज्ञानासोबतच प्रात्यक्षिकावर भर देवून पूर्ण करणे आवश्यक आहे. अभियांत्रिकी मधील प्रत्येक शाखा महत्वाची आहे. फक्त प्रत्येक शाखेचे महत्व लक्षात आले पाहिजे.

करिअर करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या इंजिनिअरिंगच्या सर्व शाखा स्वेरीमध्ये आहेत. यासाठी प्रथम मोठी स्वप्ने पहा आणि पाहिलेली स्वप्ने सत्यात उतरवण्यासाठी अफाट कष्ट करा कारण चांगले आयुष्य व्यतीत करण्यासाठी दुसऱ्यावर अवलंबून न राहता आपल्या मनगटावरील बळावर व घामाच्या धारेवर विश्वास असणे गरजेचे आहे, म्हणून प्रथम आपले ध्येय निश्चित करा आणि त्या दिशेने वाटचाल करा. अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर बाहेरच्या विश्वात वावरताना प्रत्येक प्रश्न हे तुम्हालाच सोडवावे लागतात. त्यासाठी आपण कोणत्याही क्षेत्रात जा, त्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देता आले पाहिजे.' असे प्रतिपादन जेष्ठ शिक्षणतज्ञ प्रा. नारायण दिवेकर यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरी संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयात भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या १६२ व्या जयंती निमित्त 'अभियंता दिन' आणि 'ऑलम्पस २ के २३' या तांत्रिक स्पर्धेचे उदघाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ शिक्षणतज्ञ प्रा.नारायण दिवेकर हे मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे हे होते. प्रारंभी सर विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेच्या पूजनानंतर संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी पाहुण्यांचे स्वागत करून 'अभियांत्रिकीचे शिक्षण घेताना विद्यार्थ्यांनी नवनवीन तंत्रज्ञान अवगत करून घेणे गरजेचे आहे. यशाकडे झेपावताना संघर्ष जरूर करा पण, परिस्थितीचा बाऊ न करता प्रयत्नांना योग्य दिशा द्या आणि भविष्याचा विचार करून नवीन आव्हाने स्वीकारण्यास सज्ज रहा.' असे आवाहन केले. 'ऑलम्पस २ के २३' चे विद्यार्थी अध्यक्ष ऋतुराज तारापुरकर यांनी 'ऑलम्पस २ के २३' या तांत्रिक स्पर्धेचे स्वरूप, स्पर्धेतील प्रकार, बक्षिसे, यासाठी बाहेरून आलेले स्पर्धक याबाबत सविस्तर माहिती दिली. पुढे बोलताना शिक्षणतज्ञ प्रा.दिवेकर म्हणाले की, 'विद्यार्थ्यांनी गजबजलेला स्वेरीचा हा कॅम्पस पवित्र आणि उत्साहवर्धक दिसून आला. स्वेरीने केलेल्या स्वागताने मी आज भारावून गेलो. प्रत्येक कार्यात येथील विद्यार्थी मनापासून सहभागी होतो याचा खूप आनंद वाटतो.

विद्यार्थी अभियंत्यांनी नेहमी सकारात्मक विचार करून कृती करावी. आपले यश कशात आहे हे ओळखुन आपल्या प्रयत्नांना योग्य दिशा देणे आवश्यक आहे. कल्पना, बुद्धीमत्ता, नियोजन, निर्मिती या बाबी देखील अतिशय महत्वाच्या आहेत. अपेक्षा न ठेवता केलेले कोणतेही कार्य मोलाचे असते, हे मात्र कधीही विसरू नका. निरपेक्ष भावनेने केलेल्या कामाचा भविष्यात फायदा होतो.' असे सांगून 'अभियंत्यांच्या कार्याबाबत' अभ्यासपूर्ण विचार मांडले. अध्यक्षीय भाषणातून संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे म्हणाले की, 'आपण 'बेस्ट' च्या दिशेने वाटचाल करताना स्वतःला जे योग्य वाटते त्या क्षेत्रात ध्येय निश्चित करा, आपल्यामधील योजना, संकल्पना यांना योग्य वाव द्या. मित्रांशी संवाद साधा, पर्यटन स्थळांना भेटी द्या. योगा, प्राणायम यावरही भर द्या. हे सर्व करत असताना आपण ज्या क्षेत्रात आहोत त्या क्षेत्राला प्रामाणिक आणि योग्य न्याय द्या.' असे आवाहन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी अभियंता आणि करिअर याबाबत अनेक प्रश्न विचारले असता प्रा. दिवेकर आणि व प्राचार्य डॉ. रोंगे यांनी त्यांची उत्तरे दिली.

'ऑलम्पस २ के २३'च्या निमित्ताने जिल्ह्यातील अनेक महाविद्यालयांमधील विद्यार्थी कॅम्पसमध्ये विविध प्रकल्पांच्या सादरीकरणाची तयारी करत होते. या निमित्ताने सर्व विभागात अत्याधुनिक प्रकल्प, मशीन्स, ब्रीज, बांधकामाचे नमुने यांच्या प्रतिकृती तयार करण्यात आल्या होत्या. हे प्रदर्शन पाहण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी प्रचंड गर्दी केली होती. प्रा.दिवेकर यांनी देखील सर्व विभागांना भेट देवून विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांची पाहणी करून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे कौतुक केले. अभियांत्रिकीच्या मुख्य प्रवेश द्वाराजवळील भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो) च्या 'चांद्रयान-३' च्या एलव्हीएम-३-एम ४ रॉकेटची प्रतिकृती विशेष लक्ष वेधून घेत होती. यावेळी संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त विजय शेलार, माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, विश्वस्त बी.डी. रोंगे, युवा विश्वस्त प्रा.सुरज रोंगे, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, डिप्लोमा इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतिश मांडवे, 'ऑलम्पस २ के २३' चे समन्वयक प्रा. डी.टी.काशीद, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. गजानन वाघमोडे, तृप्ती कदम व सांस्कृतिक विभाग व संवाद प्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले तर 'ऑलम्पस २ के २३' च्या सहसचिव सोनाली करविर यांनी आभार मानले.

संसदेच्या विशेष अधिवेशनात येणार ‘द प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ पीरियडिकल बिल- २०२३’

# विधेयक मंजूर झाल्यास वृत्तपत्र क्षेत्रात होणार आमुलाग्र बदल, सगळी प्रक्रीया ‘ऑनलाईन’ होणार अन् दंडाची रक्कम वाढणार

नवी दिल्ली : केंद्र सरकारने १८ ते २२ सप्टेंबर दरम्यान संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले आहे. या अधिवेशनाचा अजेंडा सरकारने सांगितला नव्हता, त्यामुळे विरोधकांनी टीका केली होती. एक देश एक निवडणूक, समान नागरी कायदा, भारत नाव बदलाचा निर्णय या अधिवेशनात होईल अशी चर्चाही रंगली होती. परंतु, सरकारने आता तात्पुरत्या अजेंड्याची लिस्ट जाहीर केली आहे. या यादीत चार विधेयके मंजूर करण्याचा प्रस्ताव या विशेष अधिवेशनात ठेवण्यात येणार आहे. लोकसभा आणि राज्यसभेच्या बुलेटिनमध्ये कार्यक्रम पत्रिका प्रकाशित करण्यात आली आहे. अधिवक्ता (दुरुस्ती) विधेयक - २०२३, द प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ पीरियडिकल बिल - २०२३ ही दोन विधेयके लोकसभेत येणार आहेत. ही दोन्ही विधेयके ३ ऑगस्ट रोजी राज्यसभेत मंजूर करण्यात आली होती. तर, पोस्ट ऑफिस बिल, २०२३ आणि मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त (नियुक्ती, सेवेच्या अटी आणि कार्यकाल) विधेयक २०२३ वर राज्यसभेत चर्चा होणार आहे. १० ऑगस्ट रोजी ही दोन्ही विधेयके राज्यसभेत सादर करण्यात आली होती.

संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले असल्याची माहिती संसदीय कार्यमंत्री प्रल्हाद जोशी यांनी काही दिवसांपूर्वी ट्विटरद्वारे दिली होती. मात्र, या संसदीय विशेष अधिवेशनाचा अजेंडा मांडण्यात आला नव्हता. त्यामुळे विरोधकांसह राजकीय वर्तुळात अनेक तर्कवितर्क लढवले जात होते. या संसदीय अधिवेशनात एक देश एक निवडणूक, समान नागरी कायदा, इंडियाचे भारत करण्याचा प्रस्ताव येण्याची शक्यता वर्तवली जात होती. परंतु, तात्पुरत्या अजेंडा यादीत या विधेयकांचा समावेश नाही. दरम्यान, १८ सप्टेंबरला विशेष अधिवेशन सुरू होण्याआधी १७ सप्टेंबर रोजी सर्वपक्षीय बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी सर्व विरोधी पक्षांच्या नेत्यांना ई-मेलद्वारे निमंत्रणे पाठवण्यात आल्याची माहिती प्रल्हाद जोशी यांनी दिली.

**द प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ पीरियडिकल बिल- २०२३ नेमकं आहे काय?**आपल्या देशातील वृत्तपत्र व नियकालिक विनियमीत करण्यासाठी प्रेस रजिस्ट्रेशन ॲन्ड बुक्स ॲक्ट १८६७ असा कायदा आस्तित्त्वात आहे, सदर कायदा १८६७ साली अर्थात ब्रिटीश काळात करण्यात आला होता त्याच कायद्यामध्ये थोडीसी दुरूस्ती स्वातंत्र्यानंतर १९५१ साली करून तसाच्या तसा कायदा आजपर्यंत देशभरात लागू आहे. अर्थात विविध परिपत्रक काढून यामध्ये वेळोवेळी बदल करण्यात आले आहे. संपूर्णतः कागदोपत्री असलेली प्रक्रिया कांही प्रमाणात ऑनलाईनही झाली आहे. मात्र २०१० साली तत्कालीन केंद्रीय माहिती व जनसंपर्क मंत्री ना. अंबिका सोनी यांनी या कायद्यात कालानुरूप बदल प्रस्तावित केले होते, तद्नंतर स्व. सुषमा स्वराज आणि ना. राजवर्धनसिंह राठोड यांनीही याबाबत प्रयत्न केले होते, मात्र सदर बदल गेले १३ वर्षे रखडले होते ते आता या बीलद्वारे केले जाणार आहेत.

✻ वृत्तपत्रांच्या अनियमिततेवर लागणार लगाम : या नव्या विधेयकामध्ये वृत्तपत्रांच्या नियमिततेवर भर देण्यात आला असून अनियमित वृत्तपत्र छोट्याशा प्रक्रियेनंतर बंद करण्याचे अधिकार संबंधीत प्रशासनाकडे देण्यात आले आहेत. नोंदीत अवधिकतेच्या एकूण अंकापैकी ५०% पेक्षा कमी अंक सलग २ वर्षे प्रकाशित करणार्या तसेच सलग दोन वर्षे वार्षिक विवरणपत्र ऑनलाईन सादर न करणार्या वृत्तपत्रांची नोंदणी रद्द करण्याचे याद्वारे प्रस्ताविक आहे. ✻ देशविरोधी किंवा अतिरेकी वृत्तीला आळा : देशविरोधी किंवा अतिरेकी वृत्तीला प्रोत्साहन देणार्या वृत्तपत्रांवर वृत्तपत्र बडतर्फीची तातडीने कारवाई करण्याचे अधिकारही देण्यात आले आहे.

✻ दंडाची रक्कम वाढणार यापुर्वी कोणत्याही अनियमिततेबाबत वृत्तपत्राला एकावेळी जास्तीत जास्त १५००/- रूपयांचा दंड आकारला जायचा ती रक्कम वाढवून आता कमीत कमी १० हजार आणि जास्तीत जास्त ५ लाख एवढी वाढविण्यात आली आहे. पुर्वी वृत्तपत्र नोंदीची संपूर्ण प्रक्रिया विनामुल्य व्हायची आता या प्रक्रियेसाठी फी आकारण्याचाही प्रस्ताव आहे.

✻ मालकी हक्क बदलताना : पुर्वी वृत्तपत्राची मालकी हक्क बदलताना केवळ एका शपथपत्राची गरज असायची ती प्रक्रिया आता संबंधीत प्रशासनाच्या अधिन असून याबाबत गरज वाटल्यास - बदलाचे कारण ‘आर्थिक’ फायद्याचे असल्यास याबाबत किती महसूल घ्यायचा याचाही विचार केला जाणार आहे आणि संपूर्ण प्रक्रियेवर प्रशासनाचे लक्ष असणार आहे.

✻ मुद्रणालय : पुर्वीच्या कायद्याप्रमाणे एखाद्याकडे ‘सायक्लोस्टाईल’ असेल तरी त्याला मुद्रणालय असल्याचे मान्य केले जायचे या कायद्यामुळे ‘झेरॉक्स आणि फोटोकॉपीयींग शिवाय कोणत्याही प्रक्रियेद्वारे केल्या जाणार्या मुद्रणाला ‘मुद्रणालय’ मुद्रण म्हणून मान्यता देण्यात आली आहे. असेच अनेक कालानुरूप बदल या अध्यादेशाने प्रस्तावित आहेत अर्थात या अध्यादेशाला मंजूरी मिळाली तर हा कायदा किती प्रमाणात प्रत्यक्षात लागू केला जाईल याबाबत साशंकता आहे.

## हन्नूर येथील अनंत चैतन्य प्रशालेत हिंदी दिवस साजरा



अक्कलकोट/प्रतिनिधीः भारतीय संविधान सभेने हिंदी ला भारताची राष्ट्रभाषा म्हणून मान्यता देऊन त्याचा दैनंदिन जीवनात, व्यवहारात अधिकाधिक वापर व्हावा याकरिता त्याचा प्रसार व प्रचार करण्यासाठी प्रयत्न केला गेला तेंव्हापासून या दिवशी प्रत्येक शाळा, महाविद्यालय, बँकेत हिंदी भाषा दिवस अतिशय उत्साहात तसेच विविध स्पर्धा, कार्यक्रमाचे आयोजन करून साजरे केले जाते.

त्याचाच एक भाग म्हणून आज महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत हिंदी भाषा दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी १५ व्या शतकातील आपल्या दोहे या पद्य रचनेच्या माध्यमातून समाजामध्ये असलेले कर्मकांड, जातीभेद, रुढी-परंपरा, अंधश्रद्धा यावर कडाडून हल्ला करणारे थोर संत कबीर व हिंदी साहित्यातील महान साहित्यिक, विचारवंत, कादंबरीकार कथालेखक मुंशी प्रेमचंद यांच्या प्रतिमेचे पुजन प्रशालेचे प्राचार्य श्री. विलास बिराजदार सर यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर इयत्ता १२ वीची विद्यार्थिनी कु.स्नेहा पटेल तर कु.पुजा रेड्डी,कु.रूपाली बाळशंकर(इ.१०वी),कु.करिष्मा जमादार,कु.जरीना जमादार (इ.९वी), कु.प्रतीक्षा मुलगे(इ.८वी)या मुलींनी अत्यंत सुंदर अशाप्रकारे हिंदीतून मनोगत व्यक्त केले.यावेळी प्रशालेचे पर्यवेक्षक श्री.अशोक साखरे सर यांनी ही थोर समाजसुधारक महान संत कबीर तसेच थोर साहित्यिक मुंशी प्रेमचंद यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकत हिंदी भाषेचे महत्त्व पटवून दिले.तर प्रा.काशीनाथ पाटील सर यांनी आपले विचार व्यक्त करत नित्य व्यवहारात हिंदी चा अधिकाधिक वापर करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना हिंदी भाषा शपथ घेण्यास प्रवृत्त केले. याप्रसंगी प्रा. रवींद्र कालीबत्ते, प्रा. रमेश शिंदे, जेष्ठ शिक्षक श्री.ज्ञानदेव शिंदे, श्री.विश्वनाथ चव्हाण, श्री. सरदार मत्तेखाने, श्री. निंगप्पा बिराजदार, श्री.शहाजी माने, श्री. सुरेश जाधव,श्री.धनंजय जोजन, श्री.राजेंद्र यंदे,सांस्कृतिक विभाग प्रमुख व हिंदी शिक्षक श्री. अप्पासाहेब काळे, सहाय्यिका सौ. मल्लमा चप्पळगाव मॅडम, सौ. स्वप्नाली जमदाडे मॅडम, जेष्ठ शिक्षिका सौ. मृदुलादेवी स्वामी, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इ. १२ वीची विद्यार्थिनी कु.वर्षा रोट्टे हीने केले तर आभार कु. शुभांगी भरमशेट्टीने मानले.

## शासकीय रुग्णालयाच्या गलथानपणाच्या निषेधार्थ आरपीआय चे आंदोलन



करमाळा/प्रतिनिधीः येथील जिल्हा उपरुग्णालयात सर्वसामान्य रुग्णांकडे दूर्लक्ष तसेच वैद्यकीय अधिकारी यांच्या गलथानपणावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी रिपाई (आठवले) चे यूवक जिल्हाध्यक्ष यशपाल कांबळे यांच्या नेतृत्वाखाली मोठे हलगीनाद आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मोठ्या संख्येने लोक उत्सफूर्तपणे सहभागी झाले होते.यावेळी यशपाल कांबळे यांनी उदागे नावाच्या एका महिलेच्या प्रसूतीवेळी रक्ताचे रिपोर्ट अन खाजगी रुग्णालयातील रिपोर्ट यात प्रचंड तफावत दिसून आली व सिझेरियनची शक्यता सांगितलेली असताना चक्क नॉर्मल डिलिव्हरी झाली या असल्या भोंगळ्या कारभाराच्या विरोधात निवेदने देऊन कारवाई ची मागणी केली असता कसलाही प्रतिसाद न आल्याने आज आंदोलन करण्यात आले असल्याचे यशपाल कांबळे यांनी सांगितले.

राजकीय वरदहस्त असल्याने संबंधित अधिकारी असे वागत असल्याचे प्रतिपादन पत्रकार प्रफुल्ल दामोदरे यांनी व्यक्त केले.अधिका-यांना पाठिशी घालणा-या राजकीय नेतृत्वाचा देखील पर्दाफाश केला जाईल असे आव्हान देखील दिले. यावेळी उपजिल्हा रुग्णालयातील प्रशासनाने उत्तर दिल्याशिवाय इथून हलणार नसल्याची ठाम भूमिका यशपाल कांबळे यांनी घेतली असता मा तहसिलदार जाधव यांनी रुग्णालय प्रशासनाच्या प्रतिनिधी मांडवे मॅडम यांना आंदोलन कर्त्यां ना कारवाई ची माहिती देण्यास सांगितले. यावेळी त्यांनी संबंधित कर्मचा-यांवर कारवाई करण्यासाठी समिती नेमण्यात आल्याचे सांगितले. या वेळी सतिश भोसले,सूहास ओहोळ, मराठा सेवा संघाचे नितीन खटके,बहुजन संघर्ष सेने चे राजाभाऊ कदम,नितिन दामोदरे, प्रफुल्ल दामोदरे, मातंग एकता आंदोलन चे युवराज जगताप. मीना भोसले यांची भाषणे झाली यावेळी प्रसेंजित कांबळे मयूर कांबळे अमोल गायकवाड सचिन गायकवाड धनराज सरोदे. शरद पवार. रंजीत कांबळे. किशोर कांबळे सुगत कांबळे असे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते

## श्री बसवेश्वर प्रशाला काजीकणबस आदर्श शाळा पुरस्कार सन्मानित



अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री बसवेश्वर प्रशाला काजीकणबस ता अक्कलकोट या प्रशालेस सोलापूर जिल्हा माध्यमिक व उच्य माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या वतीने आदर्श शाळा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले

सदर पुरस्कार पुणे विभाग शिक्षक आमदार श्री जयंत आसगावकर यांच्या शुभहस्ते संस्थेचे अध्यक्ष मा श्री प्रभाकर मजगे , मुख्याध्यापक मा श्री शिवराज किलजे , श्री कमलकर कांबळे , महेश मजगे आणि शाळेतील सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी बांधव व शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळ अध्यक्ष सुभाष माने यांच्या अध्यक्षतेखाली सदर कार्यक्रम संपन्न झाले, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोलापूर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष श्री तानाजी माने सचिव , उपाध्यक्ष , सह सचिव , विद्यासचिव सर्व कार्यकारणी सदस्य अक्कलकोट तालुका अध्यक्ष श्रीशैल पाटील सचिव पुजारी जिल्हा कार्यकारणी सदस्य श्री लक्षण चलगोरी यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघाचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले



## करमाळ्यात दुष्काळ जाहीर करावा या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीचा रस्ता रोको

करमाळा/प्रतिनिधीः संपूर्ण महाराष्ट्रात सरासरी पेक्षा कमी प्रमाणात पाऊस झाला. तसेच करमाळा तालुक्यांत देखील ८० टक्क्याही पेक्षा कमी प्रमाणात पाऊस झाला असल्यामुळे वंचित बहुजन आघाडी करमाळा शहर व तालुका शाखेच्या वतीने मौलाली माळ बायपास याठिकाणी रस्ता रोको आंदोलन करून मागणी करण्यात आली या आंदोलनातील मागण्या करमाळा तालुका दुष्काळ ग्रस्त जाहीर करावा

करमाळा तालुक्यात जनावरांना चारा छावण्या सुरू कराव्यात तालुक्यातील वाड्या वस्त्या वर पाण्याचे टँकर सुरू करावेत या आशयाचे निवेदन महसूल प्रशासनाला देण्यात आले यावेळी जि उपाध्यक्ष सुभाष ओव्हाळ जि संघटक जालिंदर गायकवाड जि संघटक विलास कांबळे शहर अध्यक्ष विशाल लोंढे तालुका उपाध्यक्ष अजय पवळ ता महासचिव नंदू कांबळे शहर उपाध्यक्ष जितेश रणबागूल उपाध्यक्ष यशवंत कांबळे सचिन घोडके उस्मान मदारी उमर मदारी मेहबूब मदारी अस्लम मदारी व तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते



## तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत अंजली कांबळे हीने पटकावला प्रथम क्रमांक

भूम/प्रतिनिधीः मराठवाडा मुक्तीसंग्रामदिनाच्या अमृत महोत्सवानिमित्त कर्मवीर परिवारातर्फे जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा, आष्टा येथे घेण्यात आलेल्या तालुका स्तरीय वक्तृत्व स्पर्धेत जिल्हा परिषद हायस्कूल ,भूमच्या अंजली कांबळे हिने प्रथम क्रमांक प्राप्त केला.सातवीत शिक्षण घेत असलेल्या अंजलीने आपल्या स्वरचित कवितेच्या माध्यमातून मराठवाड्यातील शेती अन् समस्या या विषयावर भाष्य केले. तीच्या प्रभावीमुळे भाषणामुळे रोख १००० रुपये , ट्रॉफी व महात्मा फुले लिखित गुलामगिरी पुस्तक मान्यवरांच्या हस्ते भेट देण्यात आले. शाळेतील मराठी विभागप्रमुख मुख्याध्यापक तात्या कांबळे तसेच विधाते मॅडम, दत्तात्रय गुंजाळ यांनी मार्गदर्शन केले . विधाते मॅडम यांनी रोख २०० रुपयांचे बक्षीस देऊन कौतुक केले.

प्रशालेत सर्व शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने तीचा सत्कार करण्यात आला . कार्यक्रमाला पवार के .सी . पाटील डी जी . पायघन यु .पी . पवार बी .एस . जोशी ए . टी . श्रीमती वैशाली विधाते, सुजाता साठे , हरिश साठे , अनंता झरकर उपस्थित होते .

## दलित पँथर संघटनेची युवा कार्यकारणी जाहीर



पुणे/अजिंक्य मस्के : दलित पँथर संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष यशवंत भाऊ नडगम यांच्या मार्गदर्शनाखाली युवा कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे संघटनेच्या पश्चिम महाराष्ट्र युवक अध्यक्ष सोमनाथ साळवे उपाध्यक्ष प्रथमेश तुपे पाटील पुणे जिल्हा युवक अध्यक्ष जाफर सय्यद युवक महाराष्ट्र संघटक बाबुराव क्षेत्रे पाटील कोल्हापूर जिल्हा व शहराध्यक्ष विश्वास कांबळे सांगली युवक जिल्हाध्यक्ष शलमोन कांबळे पुणे शहर अध्यक्ष सुनीता शिंनगारे अमित जगधने अध्यक्ष पर्वती मतदारसंघ व आदी कार्यकर्त्यांची नियुक्तीपत्र देऊन त्यांची नियुक्ती करण्यात आली.यावेळी यशवंत भाऊ म्हणाले की दलित पँथर या संघटनेच्या माध्यमातून येणाऱ्या काळामध्ये महाराष्ट्रातील शेतकरी, कामगार,विद्यार्थी महिला,शोषित अशा अनेक घटकांना न्याय देण्यासाठी सक्षम संघटन उभे करण्यात येणार आहे. सध्याची राजकीय परिस्थिती बघता कुठल्याही राजकीय पक्षाला सामाजिक प्रश्नांची जाणीव राहिलेली नाही.

राज्यात अनेक प्रश्न समोर असताना सर्व लोकप्रतिनिधी राजकीय पक्ष हे आपल्या मस्तीत स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी व्यस्त आहेत अशा परिस्थितीत या महाराष्ट्राची जी विचारधारा आहे ती जपण्यासाठी वरील सर्व घटकांना न्याय देण्यासाठी आपली या संघटनेची पुढील वाटचाल असणार आहे यासाठी तुमच्यासारख्या कर्तबगार व्यक्तींची निवड करण्यात आली आहे असे मार्गदर्शन करत नवीन कार्यकारणीला शुभेच्छा देण्यात आला यावेळी दलित पँथर चे सर्व कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते